जिल्हा व्यवस्थापन कक्ष DPMU(राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान)
पंचायत विभाग –जिल्हा परिषद,अमरावती
ईमेल- mhdyceo@gmail.com,rgpsazpamt@gmail.com पत्ता-कॅम्प रोड जिल्हा न्यायालयासमोर जि.प.अमरावती 444601
जाक्र/जिप/पंवि/राग्रास्वअ/1735/ 2026-27 दिनांक 2/ /2026

## दरपत्रक सुचना सादर करणे बाबत नोटीस क्रं 5

पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन 2026-27 अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा प्रशिक्षण कार्यक्रम ,क्षमता बांधणी कार्यक्रम, पेसा प्रशिक्षण इतर प्रशिक्षणे, सन 2026-27 वर्षामध्ये आयोजित इतर सर्व प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम सन 2026-27 मध्ये राबविण्यात येणा-या विविध प्रशिक्षणा करिता **(सन 2026-27 च्या मार्गदर्शक सुचनेस आधिन राहुन)** खालील नमुद प्रमाणे भोजन व्यवस्था व चहा बिस्किट ,अल्पोपहार पुरविण्याकरिता 40-50 व्यक्तींच्या सत्रा करिता खालील अटी व शर्तीचे आधिन राहुन इच्छुक पुरवठादार यांचे कडुन दरपत्रक दर मागविण्यात येत आहे.

### भोजन व्यवस्था

| अ क्र | विवरण | संख्या | |
|---|---|---|---|
| १. | **शाकाहारी जेवण थाली** | 01 | 2 भाजी (यादी नुसार),पोळी ,१ गोड पदार्थ ,पापड- 01 सलाद,मठठा दालफ्राय,जिरा राईस ,लोणचे.इत्यादी सर्व पदार्थ आवश्यकतेनुसार |
| २. | **नास्ता** | 01 | ब्रेड बटर/जॅम , समोसे,कचोरी,पोहे,उपमा,इडली, वडा सांबार,ढोकला,दोसा ,कडधान्य उसळ,उपवासाचे पदार्थ व केळी ,पपई किंवा इतर फळे इ प्रकारे (या पैकि 2 पदार्थ या कार्यालयाने वेळोवेळी सुचित केल्या प्रमाणे ) |
| 3. | **चहा /कॉफी बिस्कीट** | 01 | 2 वेळा |
| 4. | **पाणी बॉटल** | 01 | प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिवस 01 या प्रमाणे ( 500 एम एल) |

**भोजन व्यवस्था-** ( बफे पध्दतीनुसार प्रती थाली प्रमाणे )

- 2भाजी (यादीनुसार),पोळी –आवश्यकतेनुसार ,1 स्विट,पापळ,सलाद,मठठा दायफ्राय,जिरा राईस इ सर्व पदार्थ आवश्यकतेनुसार
- चहा,कॉफी बिस्किट,2 वेळा

**नास्ता**–ब्रेड बटर/जॅम, समोसे,कचोरी,पोहे,उपमा,इडली, वडा सांबार,ढोकला, दोसा ,कडधान्य उसळ,उपवासाचे पदार्थ व केळी ,पपई किंवा इतर फळे इ प्रकारे(या पैकि 2 पदार्थ या कार्यालयाने वेळोवेळी सुचित केल्या प्रमाणे )

- **भाज्यांची यादी**

1.पालक पनिर 2. मसाले वांगे3.गटटे 4.कोबी मसाला 5.चना मसाला6.पनिर बटर मसाला8.दम आलु 9.मिक्सवेज 10. व्हेज अंडा करी 11. फनस 12.शेव भाजी 13. पातोडी 14.मलाइ कोफता 15.पनिर मसाला 16. आलु मसाला 17. भेंडी मसाला इ प्रकारे (कार्यालय आदेशित करेल त्या प्रमाणे )

Scanned with CamScanner

जिल्हा व्यवस्थापन कक्ष DPMU(राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान)
पंचायत विभाग –जिल्हा परिषद,अमरावती
ईमेल- mhdyceo@gmail.com,rgpsazpamt@gmail.com पत्ता-कॅम्प रोड जिल्हा न्यायालयासमोर जि.प.अमरावती 444601

जाक्र/जिप/पंवि/राग्रास्वअ/ / 2026-27 दिनांक

**महिला बचत गट असल्यास खालील दस्ताऐवज सादर करावे**

- बचत गट नोंदणी प्रमाणपत्र
- सर्व महिला सदस्य यांची यादी
- कटरर्स म्हणुन अन्न व औषधी विभाग ) पंजीयन केलेले वैद्य प्रमाणपत्र
- अध्यक्ष यांचे PAN Card
- दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या सर्व अटी मान्य असुन दरपत्रकामध्ये सादर केलेल्या दरानुसार सर्व भोजन पुरवठा करण्याकरिता इच्छुक असल्याबाबतचे प्रमाणपत्र निविदाधारकाने दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहे.
- MSME किंवा Startup असल्यास त्याबाबतचे नोंदणीकृत प्रमाणपत्र

**इतरांकरिता खालील दस्ताऐवज सादर करावे**

- कटरर्स म्हणुन अन्न व औषधी विभाग ) पंजीयन केलेले वैद्य प्रमाणपत्र
- GST नोंदणी प्रमाणपत्र
- MSME किंवा Startup असल्यास त्याबाबतचे नोंदणीकृत प्रमाणपत्र
- दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या सर्व अटी मान्य असुन दरपत्रकामध्ये सादर केलेल्या दरानुसार सर्व भोजन पुरवठा करण्याकरिता इच्छुक असल्याबाबतचे प्रमाणपत्र निविदाधारकाने दरपत्रकासोबत देणे आवश्यक आहे.
- दुकान नोंदणी प्रमाणपत्र
- अनुभव प्रमाणपत्र
- PAN Card
- राष्ट्रीय कृत बॅंकेचे खाते बुकाची झेरॉक्स प्रत

## ➢ अटी व शर्ती –

- सदर भोजन पुरवठा हा प्रशिक्षण व क्षमताबांधणी कार्यक्रमाकरिता करावयाचा या कार्यालयाद्वारे 1 दिवस, 2 दिवस, 3 दिवस किंवा फक्त अल्पोपहार या प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन कडुन किंवा संचालक पंचायत राज पुणे यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात त्याप्रमाणे भोजन व अल्पोपहार पुरवठा संबधित निविदाकारास करावा लागेल. ब-याच वेळी विविध कारणांमुळे निश्चित केलेल्या दिनांकास प्रशिक्षण कार्यक्रम रदद् करावे लागतात किंवा पुढे ढकालावे लागतात अशा प्रसंगी निविदाकाराचे होणारी हानी लक्षात घेवुन निविदाकाराने आपले दर कार्यालयात सादर करावे.
- सदर दरपत्रक प्रक्रिया ही सन 2026-27 च्या प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमा करिता राबविण्यात येत आहे.
- सदर दरपत्रक प्रक्रिया कुठलेही क्षणी कुठलेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे.
- प्राप्त दरपत्रका पैकि कुठलेही एक किंवा सर्व दरपत्रके कुठलेल्याही क्षणी कुठलेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे.

Scanned with CamScanner

- **तसेच प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष उपस्थिती नुसार पुरवठा धारकास प्रती थालीचे दर अदा करण्यात येतील जरी प्रशिक्षणाकरिता ४० व्यक्ती बोलाविण्यात आलेले असतील पण प्रत्यक्षामध्ये १० व्यक्ती उपस्थितअसतील तर फक्त १० व्यक्तींच्या भोजनाचेच शुल्क पुरवठाधारकास अदा करण्यात येतील व अशा वेळी होणा-या पुरवठाधारकाच्या संभाव्य हानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच प्रत्यक्ष हजेरी पत्रकावरील हजेरी नुसारच पुरवठा धारक यांना देयक अदा केल्या जाईल.या बाबीची संपुर्ण जाण ठेवुनच पुरवठाधारक यांनी आपले दर या कार्यालयात सादर करावे या बाबत प्रशिक्षणा दरम्यान किंवा नंतर कुठल्याच प्रकारच्या सबबी ऐकुन घेण्यात येणार नाही .**
- **सदर दरपत्रक हे प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता बोलाविण्यात येत असल्याने प्रती सत्र प्रती दिवस ४० ते ५० व्यक्ती या प्रमाणे राहील त्यानुसार संबधित पुरवठाधारक यांना ४० ते ५० व्यक्ती करिता पुरवठा करावा लागेल याची नोंद घ्यावी .**

- सदर भोजन व्यवस्था निविदाकाराची अन्न व प्रशासन विभागामध्ये (Food license) नोंदणीकृत असणे गरजेचे आहे.
- सदर भोजन व्यवस्थेमध्ये आवश्यक असलेले संपर्ण मनुष्यबळ पुरवठा करण्याची जबाबदारी ही पुरवठादाराची असेल.
- तसेच भोजन तयार करण्याकरिता जागा या कार्यालयाकडुन उपलब्ध करुन देण्यात येणार नाही .
- सदर भोजन व्यवस्थेमध्ये आवश्यक बफे टेबल,बफे डिश,कटोरी,चमचे,व भोजन व्यवस्थेकरिता आवश्यक सर्व बिछायत साहीत्या सह पुरवठा करावा लागेल.त्या बाबत इतर कुठलेही चार्जेस देय राहणार नाही.
- भोजन व्यवस्थेचा दर्जा उत्कृष्ठ असायला हवा भोजन व्यवस्थेचा दर्जा उत्कृष्ठ नसल्यास कुठल्याही क्षणी पुरवठादाराचा करार रदद केल्या जाईल व सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.
- सदर भोजन व्यवस्थेमध्ये आवश्यक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (मिनरल वॉटर) पुरवठादारास करावी लागेल.या बाबत अतिरिक्त रक्कम अदा केल्या जाणार नाही .
- पंचायत विभाग राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्ष, जिल्हा परिषद अमरावती मार्फत घेण्यात येणा-या विविध प्रशिक्षण/कार्यशाळा /मेळावे इ करिता एकत्रित पणे हे निविदा मागविण्यात येत आहे.त्यानुसार इच्छुक पुरवठादाराने प्रती थाली दर या प्रमाणे आपले दर या कार्यालयात सादर करावे.
- सदर पुरवठया बाबत एकत्रित दर ज्या निविदाकाराचे कमी असतील त्यांना पुरवठा त्यांना किंवा खरेदी समिती जो निर्णय घेईल त्यांना पुरवठा आदेश देण्यात येइल .या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती किंवा खरेदी समिती जो निर्णय घेईल तो निर्णय अंतिम राहील.
- सदर व्यवस्थेबाबतचे संपुर्ण देयकाचे शोधन हे एकत्रितरित्या कार्यक्रम संपल्यानंतर व कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर PFMSप्रणालीद्वारे अदा केल्याजाईल.कुठल्याही प्रकारचा अग्रिम देय होणार नाही याची नोंद घेण्यात यावी .

Scanned with CamScanner

ईमेल- mhdyceo@gmail.com,rgpsazpamt@gmail.com पत्ता-कॅम्प रोड जिल्हा न्यायालयासमोर जि.प.अमरावती 444601


- देयक अदा करण्यास विलंब झाल्याच कुठल्याही प्रकारचे व्याज किंवा अतिरिक्त मोबदला देय राहणार नाही याची नोदं घ्यावी.
- सदर निविदेची प्रक्रिया कुठल्याही क्षणी कुठलेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखुन ठेवत आहे.
- वरील प्रमाणे पुरवठा करण्याबाबतचे पदार्थ हे नमुन्या दाखल नमूद केलेले आहे या मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे वेळी आदेशित केल्या प्रमाणे पुरवठा संबधित पुरवठाधारकास करावा लागेल याची नोंद घेवुन निविदा सादर करावे.
- सदर प्रशिक्षण कार्यक्रम हे अमरावती जिल्हा अंतर्गत येणा-या १४ पंचायत समिती स्तरावर (अमरावती,भातकुली,अचलपुर,अंजनगाव सुर्जी,दर्यापुर,चांदर बाजार ,चांदूर रेल्वे,धामणगाव रेल्वे,तिवसा,मोर्शी,वरुड,नांदगाव खंडे,धारणी व चिखलदरा)आयोजित करण्यात येणार आहे पुरवठा धारकास पंचायत समिती स्तर तथा जिल्हास्तर या प्रमाणे ४० ते ५० व्यक्तींच्या सत्राकरिता पुरवठा करावा लागेल तालुकास्तरावरील प्रवास खर्चा करिता अतिरिक्त रक्कम अदा केल्या जाणार नाही. त्या प्रकारे आपले दर सादर करावे.
- ज्या निविदादारांची निविदा मंजुर झाली आहे त्याने वरील प्रमाणे दर्शविलेल्या अटींची पुर्तता दिलेल्या मुदतीच्या आत न केल्यास त्या निविदा काराची निविदा रदद करुन २ क्रमांकावरिल निविदाकारास संधी देण्यात येईल.
- प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण झाल्यानंतर परिसर स्वच्छते ची जबाबदारी संबधित पुरवठाधारक यांची राहील परिसर स्वच्छ न केल्यास उचित दंड आकारण्यात येईल.
- या कार्यालयातुन वेळेवेळी दिलेल्या सुचने नुसार पुरवठा करावा लागेल.
- **प्रशिक्षणादरम्यान टोकण पध्दतीने भोजन पुरवठा करावा लागेल व टोकण पुरवठा व जमा करण्याची जबाबदारी निविदाकाराची असेल.**
- अपरिहार्य कारणास्तव प्रशिक्षण कार्यक्रम रदद झाल्यास प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता देण्यात आलेला पुरवठा आदेश रदद करण्यात येईल तसेच अशा परिस्थिती मध्ये पुरवठाधारकाचे होणा-या संभाव्य हानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही किंवा या बाबत कुठलाही मोबदला या कार्यालयामार्फत देण्यात येणार नाही

**उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्यासच तसेच वरील सुचना काळजीपुर्वक वाचुन समजुन** इच्छुक पुरवठादाराने प्रती थाली दर या प्रमाणे आपले दर या कार्यालयात दि / /2026 पर्यत सादर करावे .

Scanned with CamScanner

# जिल्हा व्यवस्थापन कक्ष DPMU(राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान)
## पंचायत विभाग –जिल्हा परिषद,अमरावती

सशक्त पंचायत सतत् विकास

ईमेल- mhdyceo@gmail.com,rgpsazpamt@gmail.com पत्ता-कॅम्प रोड जिल्हा न्यायालयासमोर जि.प.अमरावती 444601


जाक्र/जिप/पंवि/राग्रास्वअ/ / 2026-27

दिनांक

### दरपत्रक सादर करण्याबाबत वेळापत्रक
### राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्ष,जि.प.अमरावती

| | |
|---|---|
| दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दिनांक 21/5/2026 ते 27/5/2026 |
| दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिंनाक व वेळ | दिनांक 27/5/2026 5.00PM |
| दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक 29/5/2026 11.am |

**दरपत्रक सादर करण्याचा पत्ता**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.प.)

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्ष ,जि.प.अमरावती 444602

**E Mail** –mhdyceo@gmail.com , rgpsazpamt@gmail.com

(सत्यम गांधी भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद,अमरावती**

Scanned with CamScanner